राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०१४ च्या अंतिम निकालाच्या आधारावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या **गट-अ** मधील उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत....
**परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी**

महाराष्ट्र शासन
**सामान्य प्रशासन विभाग**
क्रमांक टिआरएन-०३१५/ प्र.क्र. ३४/१५/१८-ब
हुतात्मा राजगुरु चौक, मदाम कामा रोड,मंत्रालय,
मुंबई-४०००३२.
दिनांक: ०६ जून, २०१५.

वाचा : १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र. ८४/१३/१२-अ, दिनांक २० जानेवारी, २०१४.
२. शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग समक्रमांक, दिनांक ८.४.२०१५.

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-२०१४ च्या अंतिम निकालाच्या आधारे उपजिल्हाधिकारी या पदासाठी शिफारस केलेल्या खालील तक्त्यातील ३० उमेदवारांची परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी,गट-अ या पदावर दिनांक ०२.०५.२०१५ पासून दोन वर्षांच्या परिवीक्षा कालावधीवर या आदेशामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

## -तक्ता-

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गुणवत्ता क्र. |
|---|---|---|
| १ | श्री. मोहिते अभयसिंह अर्जुनराव | १ |
| २ | श्री. शेंडगे समाधान चांगदेव | २ |
| ३ | श्री. खेडेकर प्रशांत कैलास | ३ |
| ४ | श्री. साकोरे विशाल विलास | ४ |
| ५ | श्री. शर्मा विजयानंद स्वानंद | ६ |
| ६ | श्री. मोरे स्वप्निल भारत | ७ |
| ७ | श्री. देशमुख अभिषेक आबाराव | ८ |
| ८ | श्री. सदगीर नितिन किसन | १० |
| ९ | श्री. बांदल विक्रम वसंत | ११ |
| १० | श्री. थोरबोले अजित प्रकाश | १२ |
| ११ | श्री. कापडणीस स्वप्निल अरुण | १३ |

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गुणवत्ता क्र. |
|---|---|---|
| १२ | श्री. भोसले अमोलसिंह अंकुशराव | १४ |
| १३ | श्री. सुधाकर विश्वनाथ शिंदे | १५ |
| १४ | श्री. बानापुरे ज्ञानोबा पुंडलिकराव | १६ |
| १५ | श्रीमती लाभशेटवार वनश्री अवधूत | १९ |
| १६ | श्री. भंडारे सिध्दार्थ वसंता | २० |
| १७ | श्री. खेडकर महादेव विक्रम | २४ |
| १८ | श्री. चव्हाण मुकेश किसन | २७ |
| १९ | श्री. मोरे शाहुराज संभाजीराव | २८ |
| २० | श्रीमती भोसले वर्षाराणी केशवराव | ३० |
| २१ | श्री. गायकवाड निवृत्ती हिरामण | ३१ |
| २२ | श्री. मेश्राम विशालकुमार शालिकराम | ३३ |
| २३ | श्रीमती अर्चना कल्याण नष्टे | ३५ |
| २४ | श्रीमती कनिचे स्नेहल सखाराम | ३७ |
| २५ | श्री. कचरे राजेंद्र दिलिप | ३८ |
| २६ | श्री. काळे विवेक विठ्ठल | ३९ |
| २७ | श्रीमती अर्चना अर्जुन मोरे | ४१ |
| २८ | श्री. महाडिक गणेश भिकाजी | ४२ |
| २९ | श्रीमती गाडेकर उज्वला कुंडलिक | ४३ |
| ३० | श्रीमती वर्षा भिमराव लांडगे | ४४ |

## अटी व शर्ती:-

१. उपरोक्त तक्यामध्ये नमूद केलेल्या उमेदवारांची नियुक्ती दिनांक ०२.०५.२०१५ पासून दोन वर्षाच्या एकत्रित परिवीक्षा कालावधीसाठी राहील. सदर उमेदवारांनी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दिनांक २० जानेवारी, २०१४ नुसार एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत यशदा, पुणे येथे हजर रहाणे आवश्यक राहील.

२. उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केलेल्या उमेदवारांनी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक टिआरएन-२०१५/प्र.क्र. ४६/१४/१८-ब, दि. १७.०४.२०१५ नुसार त्यांच्या दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीतील पहिल्या १४ आठवड्यांसाठी रु.३०,०००/-(रु.तीस हजार फक्त) याप्रमाणे ठोक वेतन अनुज्ञेय राहील. तद्नंतर संबंधित विभागाकडे तांत्रिक प्रशिक्षणाच्या टप्प्यासाठी हजर झाल्यावर या परिवीक्षाधीन अधिका-यांच्या, १४

आठवड्यांच्या कालावधीत अदा करण्यात आलेली ठोक रक्कम आणि प्रत्यक्ष वेतन यामधील फरकाची रक्कम महसूल विभागाकडून एकरकमी अदा करण्यात येईल.

३. परिवीक्षा कालावधीत महसूल विभागाने विहित केलेली विभागीय परीक्षा, त्यासंबंधीच्या नियमानुसार उत्तीर्ण करणे परिवीक्षाधीन अधिका-यांना आवश्यक राहील. सदर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किमान दोन संधी राहतील. परीक्षेसाठीच्या कमाल संधी महसूल विभागाने परीक्षा नियमात विहित केल्यानुसार राहतील.

४. परिवीक्षा कालावधीत विहित संधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास परिवीक्षा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविण्यात येईल. या वाढीव कालावधीतही विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास, त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील आणि शासकीय सेवेकरीता त्याचा कोणताही हक्क/ दावा असणार नाही.

**५. उमेदवारांनी दोन वर्षांचा परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे व या कालावधीत त्यांची वर्तणूक समाधानकारक व त्यांच्या पदाला अनुरुप असणे आवश्यक राहील. त्यांनी परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास किंवा त्यांची वर्तणूक समाधानकारक व त्यांच्या पदाला अनुरुप नसल्याचे अथवा इतर कारणांमुळे ते या पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास, कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.**

**६. या पदावरील नियुक्तीपूर्वी शासन सेवेतील पदावर कार्यरत असल्यास व त्या पदावरील गैरवर्तणुकीची/ गैरव्यवहाराची बाब सदर परिवीक्षा कालावधीत निदर्शनास आल्यास, कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची परिवीक्षाधीन पदावरील नियुक्ती समाप्त करण्यात येईल.**

७. उमेदवारांनी सदर पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विहित केल्यानुसार संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्र विहित कालावधीत धारण न केल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

८. ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर झाली आहे आणि ज्या उमेदवारांनी संबंधित मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, अशा उमेदवारांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ मधील तरतूदीनूसार त्यांच्या जात प्रमाणपत्राच्या वैधता तपासणीच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. अशा उमेदवारांनी नियुक्तीपासून ६ महिन्यांच्या आत त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यांची नियुक्ती तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल आणि अशा उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्गीय व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन ) अधिनियम, २००० मधील तरतूदींनुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

९. उमेदवारांना शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : अनियो-१००५/१२६/ सेवा-४, दि.३१.१०.२००५ अन्वये विहित केलेली नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" (Defined Contribution Pension Scheme) लागू राहील. मात्र दिनांक १ नोव्हेंबर,२००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर नियमित स्वरुपात नियुक्त झालेल्या उमेदवारांना शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अनियो-१००६/८७/सेवा-४, दिनांक १२.०१.२००७ मधील अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहतील.

१०. उपरोक्त अटीं व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिका-यांना लागू असलेल्या सर्व महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे व इतर सेवाविषयक सर्वसाधारण नियमांचे पालन बंधनकारक राहील. तसेच यापुढे वेळोवेळी शासन जे आदेश देईल त्या आदेशांचे पालन करणेही त्यांना बंधनकारक राहील.

११. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-१११४/प्र.क्र. ८४/१८-ब, दिनांक २२.४.२०१५ अनुसार परिवीक्षा कालावधीतील प्रशिक्षणाच्या अनुषंगाने विहित करण्यात आलेली २०० गुणांची परीक्षा परिवीक्षा कालावधीच्या शेवटच्या टप्प्यामध्ये प्रशिक्षण संस्थेमार्फत घेण्यात येईल. या परिक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी जितके किमान गुण शासन विहित करेल तेवढे गुण मिळवून सदर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. या परीक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण आणि राज्यसेवा मुख्य परिक्षेमध्ये (लेखी परिक्षा व मुलाखत यांचे एकत्रित) प्राप्त केलेले एकूण गुण यांची बेरीज करुन, उमेदवारांचा त्या तुकडीतील त्या संवर्गातील क्रम व ज्येष्ठता निश्चित करण्यात येईल. याप्रमाणे ठरविण्यात येणारी अंतिम सेवाज्येष्ठता पदोन्नती तसेच सेवाविषयक सर्व अनुषांगिक बाबींसाठी लागू राहील.

१२. उपरोक्त अटींव्यतिरिक्त शासनास आवश्यक वाटतील अशा आणखी अटीही शासन घालु शकेल व त्या अटी उमेदवारास बंधनकारक असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ.संतोष भोगले )
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

प्रती-

१. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने).
३. महासंचालक, यशदा, पुणे.
४. प्रधान महालेखापाल (ले.व अ.)/(लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
६. उप सचिव ( उपजिल्हाधिकारी - आस्थापना), महसूल वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. संबंधीत उमेदवार (यशदा, पूणे या प्रशिक्षणसंस्थेमार्फत).
८. निवडनस्ती-कार्यासन साप्रवि,१८-ब.